**नि. क्र. ४५ च्या आदेशावरुन वादीतर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव** – देवदत्त शांताराम पाटणकर.

**वय** - ४९ वर्ष, **व्यवसाय** - नोकरी,

**नेमणूक** - सहा.दुय्यम निबंधक- वर्ग-२, करवीर क्र.१, कोल्हापूर. जि. कोल्हापूर.

**वादीतर्फे सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

**१.** आमच्या कार्यालयाला या प्रकरणात मूळ अभिलेखासह साक्ष देण्यासाठी येण्याबाबत पत्र प्राप्त झाले होते. त्याप्रमाणे आज साक्ष देण्यासाठी माझ्या कार्यालयाने माझी नियुक्ती केली असून मला त्याबाबतचे न्यायालयात सादर करण्यासाठी पत्र दिले आहे. आता मला ते पत्र दाखवले, त्यावरती कार्यालय प्रमुख नेवासकर साहेबांची स्वाक्षरी आहे, त्याला **नि. क्र.५०** देण्यात येतो.

२. मी सन २००९ पासून दुय्यम निबंधक, वर्ग-२ कार्यालयात कार्यरत आहे. पुर्वीच्या काळी नोंदणीकृत झालेले मूळ दस्त पक्षकारांना परत दिले जात होते. त्या काळी नोंदणीकृत झालेल्या दस्तांची आमच्या कार्यालयातील रजिस्टरला हस्तलिखित प्रत तयार केली जात होती.

३. मी आज सोबत साक्षीसमन्स प्रमाणे अनु.क्र.१३८ वरील दि.२६.०२.१९५५ च्या दस्ताची नोंद केलेले मूळ रजिस्टर सोबत आणलेले आहे. मी त्याची नक्कल आज दाखल केलेली असून त्यावरती सत्यप्रत म्हणून सह-दुय्यम निबंधक वर्ग-२ यांची स्वाक्षरी आहे. मी त्याची छायांकित प्रत काढून वरिष्ठां कडून प्रमाणित केलेली आहे. मूळ रजिस्टर प्रमाणे सदर दस्ताला पान क्र.२०३ ते २०६ आहे. मी सोबत आणलेले रजि. क्र.५९ हे दि.२९.०१.१९५५ ते १०.०४.१९५५ पर्यंतचे आहे.

४. मी आज दाखल केलेली सदर दस्ताची सत्यप्रम मूळ अभिलेखा प्रमाणे खरी व बरोबर आहे. मूळ रजिस्टरमध्ये सदर दस्त नोंदविल्यानंतर तो खरा व बरोबर असल्या बाबत तत्कालीन सहा. दुय्यम निबंधक आणि नक्कल करुन रुजवात घेणा-यांच्या स्वाक्ष-या आहेत. आता मला ती प्रत दाखवली, तिला **नि. क्र.५१** देण्यात

येतो.

**सरतपास पुर्ण.**

**<u>प्रतिवादी तर्फे उलटतपास – श्री. ए. जी. देशपांडे वकील.</u>**

**५.** प्रतिवादी तर्फे नि. क्र.५२ प्रमाणे दिलेल्या अर्जावरुन उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

**उलटतपास अपुर्ण.**

**फेर तपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २०.०१.२०२५. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.